I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 53-59
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCES
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# मानवाधिकार आणि महिलांचे अधिकार

छाया कि.बडोले

सि.एच.बी. राज्यशास्त्र विभाग
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर.
Corresponding Author : cwalde549@gmail.com

| Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022<br>Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022 |
|---|---|---|

**सारांश:**

मानवाधिकार (मानवी हक्क) २१ व्या शतकात हा एक महत्वाचा प्रश्न बनला व १० डिसेंबर १९४८ रोजी घोषित करण्यात आलेल्या मानवी हक्कांचा जागतिक जाहीरनामा व त्यांच्या प्रगतीचा निर्धारण करण्यासाठी आहे मानवी हक्कांचा संकल्पनेनुसार प्रत्येक व्यक्ती ही स्वतंत्र असायला पाहिजे आणि त्यांना त्यांच्या हक्कांची भागीदार आहेत. यामध्ये प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या जात, धर्म, वंश, वर्ण, उच्च नीच, गरीब—श्रीमंत, राष्ट्र भाषा असा कोणताही भेदभाव न करता मिळाला पाहिजे विशेषत: त्यामध्ये दिसून आलेली धार्मिकता, प्रस्थापित रूढी, समाजव्यवस्था देशातील प्रचलीत कायदे यामुळे अनेकांना मानवी हक्क नाकारले गेले आहेत आणि अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. मानवी हक्क म्हणजे नैसर्गिक अधिकारांचे धर्मनिरपेक्ष रूप आहे. प्रत्येकांना जगण्याचा स्वातंत्र्य उपभोगण्याचा व सुरक्षित असण्याचा अधिकार आहे. प्रत्येकास प्रत्येक राष्ट्राचा हद्दित संचार व वासत्व्य करण्याचे स्वातंत्र्य असण्याचा अधिकार आहे. नियोजित जोडीदारांनी स्वेच्छेने व पूर्ण संमती दिली असेल तरच विवाह करावा. महिलांना मिळालेले प्रत्येक क्षेत्रामध्ये त्यांचे अधिकार हे ७३ व्या घटनादुरूस्तीने सांगितले आहे.

महिलांना आधीच्या काळी फक्त चूल आणि मूल इतकेच मर्यादीत ठेवले जात असायचे परंतू ९३ व्या घटनादुरूस्ती मध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले आहे व २००९ मध्ये पुरूषांच्या बरोबरीने जगण्याचा अधिकार म्हणजे ५० टक्के आरक्षण देण्यात आले. परंतू आज बघितले तर प्रत्येक स्त्रिचे हे पुरूषांपेक्षा प्रत्येक क्षेत्रात मोठी प्रगती केलेली आहे व आजची स्त्री ही शक्तीशाली बनलेली आहे. मानवाधिकारामध्ये त्यांचे कार्य व अधिकारांची माहिती हेन्री डेव्हीड थेरो, न्यू लेकसीन या शास्त्रज्ञांनी सुध्दा मानवी हक्कांच्या तक्रारींची माहिती त्यांचे महत्व, अधिकार, रचना वर्गीकरण दृष्टीकोन, वैश्वीकरण, अडथळे, महिलांच्या समस्या, महिला सबलीकरण, प्रयत्न आणि उपाययोजनांचे व त्यांच्या आयोगांची कार्ये आणि जीवनाचा अविभाज्य घटक, समस्या अशा अनेक महितीसाठी व त्यांचे महत्व यामध्ये सांगितले आहे.

**बीजसंज्ञा:** मानवाधिकारे अर्थ संकल्पना कर्तव्य, अधिकार, विकास, व्याख्या, वर्गीकरण, वैश्वीकरण, सबलीकरण, समस्या व उपायोजना.

**प्रस्तावना:**

मानवधिकार (मानवी हक्क) ही संकल्पना २० व्या शतकापासून सर्व जगभरात लोकप्रिय बनलेली दिसून येते. मानव हा बुद्धिमान व विचार करू शकणारा प्राणी असून स्वत:च्या बळावर आपले स्वातंत्र्य व प्रतिष्ठा अबाधित ठेवण्याकरीता जन्माबरोबर काही अधिकार प्राप्त झालेले आहेत आणि त्यामुळेच त्याला त्याच्या कार्यात सुध्दा नव नवीन गोष्टीचा शोध लावण्याचा अधिकार सुध्दा प्राप्त झालेला आहे. आणि विनमानात सतत बदल सुध्दा करण्यात तो गुंतलेला असतो.

मानवी हक्क हा विचार २० व्या शतकात जे दोन महायुध्द झाले त्यातील अपरिमित जिवितहानीशी संलग्नीत आहेत आणि त्यामुळेच मानवाचे दैनंदिन जीवन सुरळीत चालावे यासाठी त्याला काही मूलभुत अधिकार हे 'हक्क' स्वरूपात मिळणे आवश्यक आहे आणि मानव म्हणून जगण्यासाठी आवश्यक ज्या मानवाच्या गरजा आहेत आणि ते नैसर्गिक अस्तित्वांशी संबंधीत अशा सर्व अधिकारांना मानवाधिकार सुध्दा म्हटले गेले.

१९४५ मध्ये जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर जो अणुबॉम्बचा वर्षाव झाला व बऱ्याच निरपराध लोकांचा त्यामध्ये बळी गेला आणि त्यांना अनेक हालअपेष्टा सहन करावे लागले. मानवसंहाराबरोबरच त्यांच्या मालमत्तेचीही प्रचंड हानी या राष्ट्रांची झाली आणि त्यामुळेच त्यांचे खूप मोठे नुकसान झालेले दिसून येते.

१९४८ साली मानवी क्रुरतेला आळा घालण्यासाठी मानवी हक्काचा सार्वभौतिक जाहीरनामा प्रकाशीत केला आणि मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले मानवाच्या मुलभूत अधिकारामध्ये मानवाच्या प्रतिष्ठा व मूल्य तत्वांमध्ये आणि सर्व महिला, पुरूष, बालके, लहान मोठे सर्वांसाठीच्या समान अधिकाराच्या तत्वांमध्ये निष्ठा व्यक्त केली.

स्त्रियांचे अधिकार हे वैश्वीक मानवाधिकार मध्ये महिला व पुरूषांच्या समान हक्कांचा समावेश करण्यात आला आणि या सार्वभौमिक जाहीरनाम्यातील काही अनुच्छेदांमध्ये त्यांचे अधिकार बहाल करण्यात आले होते.
अनुच्छेद : १ सर्व प्रकारच्या निवडणूकीत पुरूषाप्रमाणेच स्त्रियांना मतदानाचा समान हक्क देण्यात आला
अनुच्छेद : २ कोणत्याही प्रकारच्या विभेदीकरणाला थारा न देता पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनासुध्दा निवडणुक लढविण्याचा हक्क प्रदान करण्यात आला.

११ डिसेंबर १९४६ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण अधिवेशनामध्ये स्त्रियांच्या समानतेच्या व राजकीय हक्कास मंजुरी दिली गेली. स्त्रियांना पुरूषा एवढेच अधिकार प्रदान करण्यात आले. ज्या राज्यात मानवी हक्कांचा अभाव असतो तिथे समुदायाद्वारे त्याची जाणीव करून दिली जाते व मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी व मानवाच्या सर्वांगीण विकासाठी सामुहीक हक्क महत्वाचे आहेत.

**स्त्रियांचे अधिकार:**

महिला अधिकाराला महत्व किंवा प्राधान्य देण्याची गरज भासण्याचे महत्वाचे कारण म्हणजे आतापर्यंत सर्वच समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये अडथळे निर्माण झाले. वास्तविक पाहिले तर पुरूषाइतकेच महिलाही महत्वाच्या ठरतात. स्त्री व पुरूष या दोघांचेही जीवन एकमेंकांना पुरक आहेत.महिला विकास व मानवी हक्क यांचा निकटचा संबंध आहे. महिलांच्या मागासलेपणाचे महत्वाचे कारण म्हणजे आतापर्यंत स्त्रियांना मानवी हक्कांपासून वंचीत ठेवण्यात आले होते. स्त्रियांना मानवी हक्कांपासून वंचीत ठेवल्यामुळे स्त्रियांच्या विकासाला खिळ बसली.

दुसऱ्या महायुध्दानंतरच्या काळात स्त्रियांवरील सामाजिक व धार्मिक बंधने कमी झालीत. १० डिसेंबर १९४६ रोजीच्या वैश्वीक जाहीरनाम्यामध्ये महिला व पुरूषांच्या समान हक्कांचा समावेश करण्यात आला. या जाहीरनाम्यातील कलम–१ नुसार सर्व मानव प्राणी, स्वातंत्र्य, सन्मान व अधिकार घेऊन जन्म घेतात. ११ डिसेंबर १९४६ रोजी संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण अधिवेशनात स्त्रियांच्या समानतेच्या व राजकीय हक्कास मंजुरी दिली आणि यानंतर महिलांना पुरूषांप्रमाणे समान हक्कांची मंजूरी देण्यात आली. ९३ व्या घटनादुरूस्तीने ३३ टक्के आरक्षण महिलांसाठी लागू केले आणि त्यानंतर २००९ मध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले आणि आताच्या परिस्थिती मध्ये सर्वात जास्त जागा ह्या महिलांच्या उत्कृष्ट जागांनी भरलेले आहेत. आज सर्वच क्षेत्रामध्ये महिलांना मोलाचे स्थान मिळालेले आहे आणि आजची स्त्री ही शक्तीशाली बनलेली आहे आणि सर्वच क्षेत्रामध्ये सर्वात अधिक स्थान प्राप्त करणारी ही स्त्रिच आहे.कारण स्त्रीचे कौशलय पुरूष कधीच बघू शकत नव्हते.

**मानवी हक्क मानवाधिकारचा उद्‌य व विकास:**

१० डिसेंबर १९४८ रोजी घोषीत करण्यात आलेला मानवी हक्कांचा जाहिरनामा केवळ व्यक्तिगत स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत नाही तर त्याची व्याप्ती चांगले जीवनमान आणि सामाजिक प्रगतीचा निर्धार करण्यासाठी आहे. ‘‘आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा विधायक व सनदशीर मार्ग म्हणजे मानवी हक्क होय’’ हेन्री डेव्हिड थोरो यांनी ही व्याख्या येथे सांगितलेली आहे तर या विचारवंताने १९४९ मध्ये आपल्या (सिव्हील डिसओबिडीअन्स) या ग्रंथात केला आहे.

मानवी हक्कांच्या संकल्पनेनुसार प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र्य असून ती समान हक्कांची भागीदार आहे असे हक्क व्यक्तीला त्यांच्या जाती, धर्म, वंश, वर्ण, उच्च–नीच, गरीब–श्रीमंत, राष्ट्र, भाषा असा कोणताही भेदभाव न करता मिळाले आहे.

सर्वप्रथम इंग्लंडमध्ये १६८८ मध्ये शक्तीहीन क्रांती झाली व मानवी हक्कांच्या जाणीवेचे बीजारोपण झाले. इ.स. पूर्व ५३९ ते ४८३ या काळामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वांचा आदर्श गौतम बुध्दांनी समस्त मानवी समाजास दिला. इ.स. पूर्व तिसऱ्या शतकामध्ये कलिंग युध्दामुळे सम्राट अशोकाच्या धोरणांमुळे मानवी हक्कांना प्राधान्य मिळाले व मानवी हक्कांची पायाभूत तत्वे निर्माण झालेली दिसून येतात. १९४६ मध्ये एका जागतिक मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. याच आधारावर महिलांचे अधिकार व त्यांना प्रत्येक क्षेत्रात काम करण्याची संधी ही उपलब्ध झाली. मानवी हक्क म्हणजे व्यक्ती प्रतिष्ठेची संकल्पना आहे. स्वत:च्या व्यक्तीमत्वाचा विकास करण्यासाठी प्राप्त मानवी हक्क होय.

मानवाधिकार (मानवी हक्क) याबद्‌दल काही विचारवंतानी व्याख्या सुध्दा आपल्याला सांगितलेल्या आहेत ते खालीलप्रमाणे:

१. द न्यु लेकसीन – मानवाधिकार म्हणजे एक सामाजिक प्रक्रिया असून त्यास सामाजिक जीवनक्रमामध्ये एक विशेष जागा प्राप्त झालेली आहे. ‘‘स्वातंत्र्याचा

हक्क'' व ''स्वतंत्र्य जीवनाचा हक्क'' यात लिखित भावना म्हणजे मानवाधिकर होय.

२. ''मानवाधिकार म्हणजे मानव या नात्याने प्रत्येक मानवाला असलेले नैसर्गिक अधिकार होय.''

३. हेन्री डेव्हिड थेरो – ''आंतराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा विधायक व सनदशीर मार्ग म्हणजे मानवाधिकार होय.''

**मानवाधिकार आयोगाची कार्ये व अधिकार:**

१. मानवी हक्कांचा उल्लंघनाबाबतच्या तक्रारींची चौकशी करणे.

२. न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या मानवी हक्कांच्या कार्यवाहीमध्ये न्यायालयाच्या संमतीने मध्यस्थी करणे.

३. मानवी हक्कांसंबधी कायद्यांनी केलेल्या संरक्षणाचा आढावा घेणे आणि ते अधिक परिणामकारक ठरावे यासाठी उपाययोजना करणे.

४. दहशतवादासह सर्व घटकांचा आढावा घेणे आणि सुधारात्मक उपाय सुचविणे.

५. मानवी हक्कांसंबधी संशोधनात्मक ग्रंथांचा आणि आंतरराष्ट्रीय दस्ताऐवजांचा अभ्यास करणे आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

६. समाजाच्या विविध स्तरांमध्ये मानवी हक्कांसंबंधी साक्षरतेचा प्रसार करणे.

७. मानवी हक्क क्षेत्रामध्ये कार्यरत बिगर सरकारी संघटना व संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

८. मानवी हक्कांच्या प्रचलनासाठी त्याला आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करणे.

यानंतर त्यांनी मानवाधिकारांचे वर्गीकरण करतांन त्यांनी दोन गटांमध्ये विभागणी केलेली दिसून आली व त्यांच्या हक्कांसंबधी काही मुद्दे पण सांगितले आहेत.

प्रत्येक माणसाला जीवन जगण्याचा सामाजिक प्रतिष्ठेचा आणि सुरक्षिततेचा अधिकार आहे आणि त्यामुळेच मानवाच्या स्वाभाविक प्रतिष्ठेचा आणि गुणवत्तेचा आदर करणे हा मानवी अधिकाराचा आधार आहेत. मानवी अधिकाराच्या प्राचीन ग्रीक रोमन देशाच्या काळात अस्तित्वात आलेली संकल्पना आहे कारण तत्वज्ञानी लोकांच्या मते मानवाधिकाराचा जन्म नैसर्गिक अधिकारापासून झाला आहे. मानव या नात्याने प्रत्येक मानवाला नैसर्गिक अधिकार असतात. मानवाधिकार अत्यूच्च न्याय तत्वांवर आधारीत असल्यामुळे प्रचलीत कायद्यापेक्षा श्रेष्ठ ठरतात.

मानवाधिकार म्हणजे मानव या नात्याने प्रत्येक मानवाला असलेले नैसर्गिक अधिकार होय मानवी हक्क ती संकल्पना २० व्या शतकात जगात सर्वत्र लोकप्रिय बनली आहे. मानव हा बुध्दिमान व विचार करू शकणारा प्राणी आहे. त्यांना स्वत:चे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा अबाधीत ठेवण्याकरीता जन्माबरोबरच काही अधिकार प्राप्त झाले असतात. रोमन लोकांनी न्यायप्रक्रियेसाठी कायद्याच्या राज्याची जोपासनी करणारी संस्था निर्माण केली आणि ती आता अत्यंत आदर्श ठरलेली आहे. रोमन लोकांनी जुन्या कायद्यांना अद्यावत स्वरूप दिलेले आहे आणि ते आता कायदेविषयक प्रक्रियेसाठी नैतिक मानके असावित असा आग्रह सुध्दा त्यांनी केलेला आहे.

१९४५ मध्ये जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर जेव्हा अणुबॉम्बचा वर्षाव झाला तेव्हा त्यामध्ये अनेक निरपराध लोकांचा त्यात बळी गेला आणि मानवसंहारा बरोबरच मालमत्तेची प्रचंड हानी या राष्ट्राची झालेली होती. त्यामुळे ही राष्ट्रे आर्थिक दृष्टया कमकुवत झाली व या युध्दामुळे झालेली प्रचंड मानवहानीमुळे जगातील मानवतावादी तज्ञ राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते यांनी यावर आत्मपरिक्षण करण्यास प्रारंभ केला. संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन १९४८ साली मानवी क्रुरतेला आळा घालण्यासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. संयुक्त राष्ट्रसंघाने मानवाच्या मुलभूत अधिकारामध्ये मानवाच्या प्रतिष्ठा व मूल्यतत्वामध्ये सर्व महिला, पुरूष व बालके लहान मोठे सर्वांसाठीच्या समान अधिकराच्या तत्वामध्ये निष्ठा व्यक्त केलेली आहे.

मानवाधिकार आयोग मानवाच्या अधिकाराची अवहेलना करणाऱ्या घटनांची चौकशी करतात व मानवाधिकार आयोग अनुसंधान व शांध आदि गोष्टींना प्रोत्साहीत करतात. मानवाधिकाराकडून मानवी हितसंबधाचे रक्षण करण्याची अपेक्षा करण्यात आली व आज त्यांचे चांगले परिणाम आपल्याला दिसुन येत आहे ते निर्विवाद सत्य आहे.

**मानवाधिकाराचे वैश्वीकरण:**

मानवाच्या सर्वांगिण विकासासाठी अधिकार आवश्यक आहेत. त्याशिवाय मानव आपला विकास करू शकत नाही. म्हणूनच आज मानवाधिकार हे व्यक्तिचा अविभाज्य भाग मानला जातो. प्रथम महायुध्दानंतर मानवाधिकारांचा प्रसार व वैश्वीकरणासाठी प्रयत्न करण्यात आले. १९४५ मध्ये जेव्हा जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर अणुबॉम्ब वर्षाव झाला व त्यामध्ये बऱ्याच निरपराध लोकांचा त्यात बळी गेला व त्यांच्या काही मालमत्तेची त्याठिकाणी प्रचंड हानी या राष्ट्रांची झाली. या युध्दात झालेल्या प्रचंड हानीमुळे जगातील

मानवतावादी तज्ञ, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते यांनी यावर आत्मपरिक्षण व चर्चा करण्यास प्रारंभ केला आणि संयुक्त राष्ट्रसंघाने त्यामध्ये पुढाकार घेऊन १९४८ साली मानवी क्रुरतेला आळा घालण्यासाठी मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहीरनामा प्रकाशित केला व मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले. यासमध्ये सर्व महिला, पुरूष व बालके लहान मोठे सर्वांसाठीचे समान अधिकाराच्या तत्वामध्ये निष्ठा व्यक्त केली.

आणि २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. आणि युध्दाच्या भयानक आपत्तीपासून भावी पिढीचे संरक्षण करणे हे आपले मुख्य ध्येय असल्याचे घोषित केले होते. मानवी हक्क मुलभूत स्वातंत्र्ये यांची हमी मिळाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे रक्षण करणे शक्य होणार नाही म्हणून संयुक्त राष्ट्र संघाने मानवाधिकारांना तितकेच महत्व दिलेले आहे. लिंग, वंश, भाषा, व धर्माचा कोणताही भेदभाव न करता सर्वांना जगण्याचा समान अधिकार व्यक्ती स्वातंत्र्य यांचा मानवाधिकार आयोगानी स्विकार केलेला आहे.

१. लोकशाहीत मानवी हक्कांची प्रतिष्ठा.
२. गरिबीचे मानवी हक्कांवर होणारे परिणाम.
३. मानवी अधिकारांच्या रक्षणातूनच लोकशाहीला बळकटी.
४. शांतता आणि सुरक्षा ही मुल्ये साध्य करण्यासाठी उपयुक्तता.
५. मानवाच्या स्वाभाविक प्रतिष्ठा आणि गुणवत्तेचा आदर.
६. सर्वक्षेत्रात समानता स्वातंत्र्य निर्माण करण्यास उपयुक्तत्र.
७. स्वार्थी वृत्तीचा विनाश व स्वतंत्र्य विचाराला प्रोत्साहन.
८. आंतकवादी गतीविधी आणि मानवाधिकार.

लोकशाही व्यवस्थेचे मुख्य लक्षण सांगितले जाते की, या व्यवस्थेत जास्तीत जास्त अधिकारांना मान्यता दिले असते.

**मानवाधिकारासमोरील येणारे अडथळे व आव्हाने:**

भारतामध्ये मजबुत नियम असल्यानंतरही मानवाधिकाराचे मोठ्या प्रमाणात उल्लघंन होत राहिल्यास लोकशाही शासन व्यवस्था यशस्वी होऊ शकत नाही. मानवाधिकाराचे रक्षण करणे लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे. केवळ अधिकारापासून वंचित ठेवणे सुध्दा मानवाधिकाराचे हनन आहे. नियम आणि कानून व राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची सक्रियता असल्यानंतरही मानवाधिकाराचे हनन होते. याचा सरळ अर्थ असा की, या मार्गात बरेच अडथळे आहेत. हक्काचा उगम व त्याची निर्मिती याबाबत विविध विचारवंतामध्ये मतभेद असल्याचे आढळून येतात. आणि मानवाच्या विकासासाठी अधिकार आवश्यक आहेत अनेक विचारवंतांनी अधिकाराचे महत्व सांगितलेले आहेत म्हणूनच आज मानवाधिकार हा मानवाचा अविभाज्य घटक/भाग मानला जातो.

दुसऱ्या महायुध्दानंतर खऱ्या अर्थाने मानवाधिकराचे महत्व कळू लागले व झालेल्या मानवजातीचे हनन यामुळे सर्वांना युध्द नकोसे झाले. युध्दांत मानवसंहाराबरोबरच मालमत्तेचाही बऱ्याच प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे ही राष्ट्रे आर्थिक दृष्ट्या डबघाईला आली. या सर्व कारणामुळे जगातील नागरिकांनी आत्मपरिक्षण करून चर्चा करण्यासा प्रारंभ केला. १९४८ साली मानवी क्रुरतेला आळा घालण्यासाठी मानवी हक्कांचा सार्वभौमिक जाहीरनामा प्रकाशित करून मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या दृष्टीने पहिले महत्वाचे पाऊल उचलले. वैयक्तीक अधिकारांचे दृष्ट राज्यकर्त्यांपासून संरक्षण करण्यसासाठीच आंतरराष्ट्रीय कायदा संस्थेची स्थापना करण्यात आली. अमेरीका, आशिया, युरोप व संपुर्ण जगाला मानवाधिकाराच्या आंतरराष्ट्रीय मान्यतेचा संदेश देण्यासाठी प्रयत्न करण्यात आला.

लिंग, वंश, भाषा व धर्माचा कोणताही भेदभाव न करता सर्वांना जगण्याचे समान अधिकार व्यक्ति स्वातंत्र्य यांचा मानवाधिकार आयोगांनी स्विकार केला.

**अडथळे/आव्हाने:**

१. मानवी हक्कांची होणारी पायमल्ली झाल्यामुळे देशात अनेक समस्या निर्माण होतात.
२. गरिबांचे मानवी अधिकारांवर व त्यांच्या हक्कांपासून वंचित राहावे लागते.
३. निरक्षण व्यक्ती हक्कांविषयही अनभिज्ञ निरक्षर मानवाला मानवी हक्कांपासून वचित ठेवण्यास कारणीभूत ठरते.
४. बरोजगार व्यक्ती मानवी हक्कांनाही वंचित ठेवण्यासाठी बेकारी हा घटक मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत असते. आपल्या देशात आजही सुमारे ७० टक्के लोक शेतीव्यवसायावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या अवलंबून आहेत.
५. हिंसाचारामुळे घटनात्मक मार्गावरील विश्वासास तडा—सामाजिक हिंसाचाराचे वाढते प्रमाण हे देखील मानवाधिकाराच्या मार्गात अडथळा निर्माण करीत आहे.

६. भ्रष्टाचार समाजाला लागलेली किड– मानवी हक्कांच्या संकोच होण्यास समाजातील प्रशासकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहे. भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य माणसाला त्याचा जबर फटका बसलेला आहे.
७. छहशतवाद जगाला भेडसावणारी समस्या– मानवी अधिकाराला पायदळी तुडवीले जाण्याचे प्रकार ज्या काही घटकामुळे होतात त्या घटकामध्ये दहशतवाद हा अतिशय महत्वाचा घटक मानला जातो.
८. कष्टकरी वर्गाचे शोषण – कष्टकरी जनतेचे होत असलेले आर्थिक शोषण हे अतिशय चिंतेची बाब आहे.
९. पोलिसांकडून/अधिकाऱ्याकडून अधिकाराचा गैरवापर – अधिकाऱ्यांना आपल्या कर्तव्याचा विसर पडतो आणि त्यांच्यात अधिकाराशाही प्रवृत्ती वाढीस लागतात.

**महिलांच्या समस्या:**

स्त्री व पुरूष लोकसंख्ये मधील तफावत म्हणजे लिंग विषमता होय. लिंग विषमतेची प्रमुख कारणे म्हणजे नैसर्गिक मृत्यू दर व लिंग नियंत्रण २० व्या शतकातील सर्व युध्दात जेवढ्या पुरूषांच्या मृत्यू झाला. त्यापेक्षा अधिक स्त्रियांना गेल्या ५० वर्षात मारले गेले. लिंग विषमता अधिक असणाऱ्या चीन, भारत व पाकिस्तान या देशात पुढील तीन ठळक वैशिष्टे आढळून येतात.
१. प्रजनन दरात जलद गतीन घट झाली आहे.
२. स्त्रियांवर मुलांनाच जन्म घ्यावा म्हणून मोठ्या प्रमाणात दबाव आहे.
३. गर्भ लिंग तपासणी व स्त्री भ्रुणहत्या करण्यासाठी उपलब्ध असणारी तंत्रे.
२०११ च्या जणगणनेनुसार भारतातील स्त्रियांचे प्रमाण दर पुरूषांमागे ९४६ इतके आहे. तर २००१ च्या जणगणनेनुसार हेच प्रमाण ९३३ इतके होते.

पुरूषप्रधान भारतीय समाज, स्त्रीला मनुष्यबळाच्या पुरवठयाचे साधन म्हणून पाहण्याची वृत्ती, स्त्रीचे 'चूल व मुल' एवढे मर्यादित कार्यक्षेत्र, परावलंबन, असुरक्षितता, दास्यत्वाची भावना इ. मुळे भारतीय स्त्रियांचा समाजातील दर्जा नेहमीच निम्न स्वरूपाचा राहिला आहे.

मुलींचे लोकसंख्येतील प्रमाण वाढावे याकरीता महाराष्ट्रात 'सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना' राबविण्यात येते. अहमदनगर जिल्हयातील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुधा कांकरिया हया स्त्री भ्रुणहत्या रोखण्यासाठी अनेक अभिनव उपक्रम राबवित आहेत तसेच राज्यात स्त्रीभ्रुणहत्या विरोधात 'लेक वाचवा' या मोहिमेसाठी सचिन आणि सुप्रिया पिळगावकर ब्रॅड ॲम्बेसेडर म्हणून नेमले आहे.

स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी १९९४ मध्ये प्रसुतीपूर्व गर्भ लिंग निदान तंत्र प्रतिबंध कायदा संमत केला आहे. या कायदयात २००३ मध्ये सुधारणा करून तो आणखी कठोर बनविला आहे.

**महिला सबलीकरण:**

स्त्रियांचा दर्जा म्हणजे त्यांचे समाजातील स्थान संख्यात्मक व गुणात्मकदृष्टया मोजता येतो. संख्यादृष्टया म्हणजे शिक्षण व रोजगारातील स्त्रियांचे प्रमाण लिंग–गुणोत्तर, सरासरी आयुर्मान, माता मृत्यू इ. तर गुणात्मकदृष्टया म्हणजे राकीय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग संसाधनाची उपलब्धतता, संचार स्वातंत्र्य, इ. होय. काबाडकष्ट अनारोग्य, निरक्षर, हिंसा, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना दुहेरी–तिहेरी जबाबदाऱ्या पार पाडताना करावी लागणारी कसरत या गोष्टी सर्व स्त्रियांना कमी अधीक प्रमाणात अनुभवास येतात. यामुळेच स्त्री–पुरूष समानता निर्माण व्हावी, स्त्रियांना प्रतिष्ठा व मान सन्मान मिळावा व त्यांना स्वावलंबी होता यावे याकरीता महिला सबलीकरणाची आवश्यकता आहे. ब्राझीलच्या पावलो फिरे यांनी सर्वप्रथम 'महिला सबलीकरण' ही संकल्पना मांडली महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांना शक्ती, क्षमता व कौशलये वृध्दिंगत करण्यासाठी तसेच त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक ते सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, वातावरण निर्माण करणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

**घटक:**

१. महिलांची सामाजिक प्रगती.
२. आर्थिक बाबीतील महिलांचा सहभाग.
३. महिलांचा राजकारणातील सहभाग.
संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून साजरे केले व १९७५ पासूनच ८ मार्च हा दिवस 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणन साजरा केला जातो.

**महिला सबलीकरणाचे प्रयत्न:**

१. १९७४ मध्ये स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारने नेमलेल्या समितीने 'समानतेकडे' हा अहवाल प्रसिध्द केला.
२. १९७५ मध्ये 'मेक्सिको प्लॅन ऑफ ॲक्शन' द्वारे स्त्री–पुरूष समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

३. १९७९ मध्ये स्त्रियांविरूध्द केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावाच्या उच्चाटणासाठी करारनामा (सीडॉ) करण्यात आला.

४. पाचव्या पंचवार्षिक योजनेपासून स्त्रियांसाठी कल्याणकारी योजनाऐवजी विकासात्मक योजना सुरू केल्या.

५. १९९० च्या राष्ट्री महिला आयोग कायद्यान्वये ३१ जानेवारी १९९२ रोजी राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली.

६. १९९४ मध्ये प्रसूतीपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदा करण्यात आला. महाराष्ट्र सरकारने हा कायदा यापूर्वीच म्हणजे १९८८ मध्ये केला असून असा कायदा करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य ठरले.

७. राजकीय सहभाग वाढविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलासांठी ५० टक्के आरक्षण सुरू केले.

**उपाययोजना:**

महिला विकासाचा आणि सबलीकरणाची काही शासकीय धोरणे व त्यांचे उपाययोजना आहेत.

१. हिंदू विवाह कायदा – १९५५

या कायद्यात हिंदू या शब्दाचा अत्यंत व्यापक अर्थ घेतला असून हिंदू धर्माच्या अनेक पंथ, उपपंथ व जातीजमातींचा समावेश केला आहे. हिंदू धर्म व त्यात समाविष्ठ असणारे वीरशैव, लिंगायत, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, बौध्द, जैन, शीख यांना हा कायदा लागू आहे. या कायद्यानुसार अनेक पत्नी विवाहास प्रतिबंध केला असून वृध्द, रोगी, मानसिकदृष्ट्या विकृत, नपुसंक पुरूषाच्या विवाहास प्रतिबंध केला आहे.

२. अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा १९५६

वेश्यागृह चालविणे, वेश्या व्यवसायासाठी प्रवृत्त करणे वगैरे अनैतिक व्यापारांना प्रतिबंध घालण्यासाठी हा कायदा संमत करण्यात आला. या कायद्यात वेश्यागृह चालविणाऱ्या व्यक्तीला किमान १ वर्ष व कमाल ३ वर्ष कारावास व २०००/– रू. दंडाच्या शिक्षेची तरतूद केली आहे. या कायद्यात १९८६ मध्ये दुरूस्त्या करण्यात आल्या.

३. मातृत्व लाभ कायदा १९६१

प्रसूती काळात महिलांना रजा मिळावी तसेच रजेच्या कालावधीत पगार व अन्य लाभ मिळावे इ. बाबतीत या कायद्यांतर्गत तरतूदी केल्या आहेत.

४. हुंडाबंदी कायदा १९६१

हुंडा घेणाऱ्या किंवा देणाऱ्या व्यक्तीला किंवा हुंडा देण्यास/घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या व्यक्तीला या कायद्यानुसार किमान ५ वर्षाचा कारावास आणि किमान १५,०००/– रू. दंड किंवा हुंडयाची किंमत यापैकी जास्त असणारी रक्कम अशी शिक्षा दिली जाते.

५. स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंध) कायदा

जाहिराती किंवा प्रकाशन, लेख, आकृत्या किंवा अन्य कोणत्याही प्रकारे स्त्रियांचे होणारे असभ्य प्रदर्शन रोखण्यासाठी हा कायदा संमत करण्यात आला. या कायद्यामध्ये गुन्हा करणाऱ्या व्यक्तीस किमान ६ महिने व कमाल ५ वर्षे कारावास व १०,०००/– रू. दंडाच्या शिक्षेची तरतूद केली आहे.

६. सतीप्रथा प्रतिबंध कायदा १९८७

सतीप्रथेचे उदात्तीकरण थांबविण्यासाठी हा कायदा संमत करण्यात आला. सती जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीस १ वर्षापर्यंतचा कारावास तर सती जाण्यसास भाग पाडणाऱ्या किंवा प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीस मृत्यूदंड किंवा आजन्म करावासाच्या शिक्षेची तरतूद केली आहे.

७. गर्भधारणापूर्व व जन्मपूर्व निदान तंत्रे कायदा १९९४

लिंग निवडीच्या भेदभावमूलक प्रकारांना आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार केंद्र सरकारने हा कायदा १९९४ मध्ये संमत केला. पुढे २००३ मध्ये कायद्यात काही सुधारणा करण्यात आल्या. लिंग निवडीच्या तंत्रावर बंदी घालणे व जन्मपूर्व लिंग निवड करून होणारे गर्भपात टाळणे ही या कायद्याचा मुख्या उद्देश आहे. लिंग निवडीच्या कोणत्याही स्वरूपातील जाहीराती करणाऱ्यास ३ वर्षापर्यंतच्या कारावासाची व १०,०००/– रू. दंडाच्या शिक्षेची तरतूद केली आहे.

८. कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा

हया कायद्याची २६ ऑक्टोंबरर २००६ पासून अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यानुसार शारिरीक, लैंगिक, शाब्दिक, भावनिक किंवा आर्थिक प्रकारच्या छळांचा समावेश घरगुती हिंसाचारामध्ये होतो. बेकायदेशीरपणे केलेली हुंडयाची मागणी सुध्दा घरगुती हिंसाचारामध्ये समाविष्ठ केली आहे. या कायद्याने विवाहित महिलेबरोबरच विधवा बहीण, आई, एकटी राहणारी महिला यांनासुध्दा संरक्षण दिले जाते.

९. कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा होणारा लैंगिक छळ

कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा होणारा लैंगिक छळापासूनच्या तक्रारीचे निवारण व्हावे म्हणून हा कायदा संमत करण्यात आला. या कायद्याचे विधेयक २ सप्टेंबर २०१२ रोजी लोकसभेने व २६ फेब्रुवारी २०१३ रोजी राज्यसभेने संमत केले. दि. २३ एप्रिल २०१३ रोजी या विधेयकावर राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केली आणि हा कायदा खाजगी क्षेत्रासह संघटीत व असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आला.

**महिला आयोगाची कार्ये:**

१. स्त्रियांमध्ये कायदेशीर बाबीसंबधी जाणीव निर्माण करणे.
२. विद्यमान सेवांच्या माध्यमातून स्त्रियांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सहाय्य करणे.
३. जलद गतीने न्याय देण्यासाठी देशाच्या विविध भागात पारिवारीक महिला लोक अदालत सुविधा सुरू करणे.
४. स्त्री सबलीकरणासाठी प्रोत्साहनपर कृती कार्यक्रम हाती घेणे व स्त्रियांच्या दर्जाबाबत माहिती मिळवणे.
५. स्त्रियांच्या सुरक्षेविषयी घटनात्मक व वैधानिक मार्गाने पुरविलेल्या सुविधांचे अन्वेषण व तपास करणे.
६. घटनात्मक व कायदेशीर बाबींचे उल्लंघन करणाऱ्या तक्रारींची दखल घेणे.
७. महिलांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवणाऱ्या बाबींविषयी स्वयंप्रेरणेने दखल घेणे.
८. स्त्रियांच्या बाबतीत भेदभावामूलक धोरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या व परिस्थितीबाबत विशेष अभ्यास व अन्वेषण करणे.
९. महिलांना सर्व क्षेत्रात योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून प्रोत्साहनपर व शैक्षणिक संशोधन करून मार्ग सुचविणे.
१०. महिला सबलीकरणास अडथळा ठरणाऱ्या घटकांचा शोध घेणे.
११.तुरूंग, रिमांड होम, स्त्री संस्था यासारख्या ठिकाणी स्त्रियांना जेथे कैदी म्हणून ठेवण्यात येते अशा ठिकाणी भेटी देवून तपास करणे व आवश्यकतेनुसार उपायोजनात्मक कारवाई करणे.

**मानवाधिकार मानवी जीवनाचा अविभाज्य घटक:**

मानवी हक्क व व्यक्ती विकास या गोष्टी परस्परसंबंधीक आहेत. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. मानवाला समाजाचा घटक म्हणून जीव जगत असतांना तिला स्वत:चा विकास करून घेण्यासाठी मानवाधिकारांची गरज असते त्याशिवाय आपला विकास करू शकत नाही. म्हणूनच हक्क व व्यक्ती विकास अधिक निकटचा संबंध आहे. प्रत्येक व्यक्तिला जन्मताच अधिकार प्राप्त असतात असे काही विचारवंत म्हणतात. त्यांच्या मते व्यक्ती व मानवाधिकार अविभाज्य आहेत मानवी हक्कांशिवाय आपण सुसंस्कृत मानवी जीवनाची कल्पनाही करू शकत नाही. मानवधिकाराला जर मानवापासून दूर केले तर मानव आपला विकास करू शकणार नाही. अधिकार ही मानवासाठी आवश्यक गोष्ट झाली आहे. म्हणूनच मानवाधिकार मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे.

आतापर्यंत सर्वच समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्या विकासाला अडथळे निर्माण झाले होते. तसेच बालकांच्या हक्कांचे उल्लघंन झाल्याने बालकांच्या सर्वांगीण विकासात अडथळे निर्माण झाले. बालकांच्या हक्कांची होणारी पायमल्ली पाहून संयुक्त राष्ट्रसंघाने पुढाकार घेऊन उपाययोजना केल्या. १० डिसेंबर १९४८ रोजी मानवाधिकाराचा सार्वभौमिक जाहीरनामा स्विकृत केला. त्यामाध्यमातून महिला व बालकांचा विकास करण्यासाठी मानवाधिकार उपयुक्त ठरला.

**मानवाधिकारांच्या समस्या:**

१. गरिबीचे मानवी हक्कांवर होणारे परिणाम.
२. गरिबीमुळे व्यक्तीत्व विकासाला बाधक.
३. निरक्षरता
४. बेकारी
५. सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक प्रथा.
६. हिंसाचार
७. भ्रष्टाचार समाजाला लागलेली कीड.
८. दहशतवाद जगाला भेडसावणारी समस्या.
९. पोलिसांकडून अधिकारांचा गैरवापर.
१०. मुल्यमापन.

**संदर्भ :**

डॉ. संदीप भिमराव काळे – मानवी हक्क आणि महितीचा अधिकार, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१६
प्रा. श्रीमती सुधाराणी श्रीवास्तव व आशा श्रीवास्तव – महिला शोषण आणि मानवाधिकार, अर्जुन प्रकाशन, दिल्ली, २००४
ॲड. अभया शेलकर – माहितीचा अधिकार, हरिष ग्रोवर, औरंगाबाद प्रकाशन, २००४,२००५
प्रा. दत्तात्रय सांगोलकर – मानवी हक्क, जिज्ञासा प्रकाशन, २०१३, २०१४
प्रा. शोभा कशिसागर – समग्र मानवी हक्क, के सागर प्रकाशन, २०१३, २०१४